# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०८.१०.२०२४**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (०२.१०.२०२४ ते ०८.१०.२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (०९.१०.२०२४ ते १३.१०.२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | दिनांक | ०९ | १० | ११ | १२ | १३ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | १० | १६ | २० | २५ | १२ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३३ | ३४ | ३३ | ३३ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २२ | २२ | २३ | २३ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ७ | ७ | ८ | ८ | ६ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८५ | ८७ | ८३ | ८५ | ८६ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६२ | ६१ | ६१ | ६० |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ५ | ६ | ८ | १२ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | द.आ | पू.आ | पू.आ. | पू. | पू. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार **सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक ९ ते १३ ऑक्टोबर दरम्यान आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक ९ आणि १३ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची तर दिनांक १०, ११ व १२ ऑक्टोबर रोजी काही ठिकाणी मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये १३ ऑक्टोबर पर्यंत कमाल तापमान ३२ ते ३४** अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २२.० ते २३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ८५ ते ८७% तर दुपारची सापेक्ष आद्रता ६० ते ६४% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी ०५ ते १२ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक ९ ते १५ ऑक्टोबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा जास्त तसेच कमाल तापमान सरासरी दरम्यान व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान इशारा** | | ➢ सातारा जिल्ह्यामध्ये दिनांक ८, ९, १० व ११ ऑक्टोबर रोजी तुरळक ठिकाणी मेघर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० इतक्या वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ **कमाल तापमानामध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वतःची व आपल्या पशुधनाची काळजी घ्यावी.**<br>➢ पावसाची उघडीप असताना व वाऱ्याचा वेग कमी असताना कीटकनाशक व बुरशीनाशकाची फवारणी करावी. फवारणी करताना स्टीकरचा वापर करावा.<br>➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून **"मेघदूत"** अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी **"दामिनी"** अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ **शेतकरी बांधवांनी मेघ गर्जना व विजांचा कडकडाट होण्याची शक्यता असल्याने पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी.**<br>➢ शेतामध्ये काम करत असल्यास त्वरित सुरक्षित ठिकाणी जावे. झाडाखाली थांबणे टाळावे.<br>➢ जनावरे तलाव, नदी किंवा इतर पाण्याच्या ठिकाणी असतील तर त्यांना त्वरित बाहेर काढून सुरक्षित ठिकाणी ठेवावे.<br>➢ जनावरे ट्रॅक्टर किंवा इतर धातूंच्या वस्तूंपासून लांब बांधावीत.<br>➢ काढणी केलेला शेती माल प्लास्टिकच्या शीटणे झाकावा.<br>➢ विद्युत उपकरणे, विद्युत तारा यांचा संपर्क टाळावा.<br>❖ जनावरांना झाडाखाली जमा होऊ देऊ नये. |
| संदेश | | ➢ हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या सोयाबीन, भुईमूग, खरीप ज्वारी व बाजारी इ. पिकाची त्वरित काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल सुरक्षित ठिकाणी ठेवावा. |
| भात | फुलोरा ते दाणे भरणे | ➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी भात फुलोरा ते दाणे भरणे अवस्थेत असताना १० सें. मी ठेवावी |
| रब्बी ज्वारी | पेरणी | ➢ रब्बी हंगामामध्ये ज्वारीची पेरणी १५ ऑक्टोबर पर्यंत पावसाच्या ओलीवर ५ सें.मी. खोलीपर्यंत करावी.<br>➢ पेरणी ४५ x १५ सें.मी. अंतरावर करावी.<br>➢ बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ४ ग्रॅम गंधक (३०० मेश पोताचे) चोळावे तसेच २५ ग्रॅम अ‍ॅझोटोबॅक्टर व पी.एस.बी. कल्चर चोळावे.<br>➢ खते: मध्यम जमिनीसाठी नत्र:स्फुरद: पालाश ४०:२०:०० किलो प्रती हेक्टरी याप्रमाणात द्यावे. यापैकी नत्र खताचा पहिला हप्ता (१/२ नत्र ) संपूर्ण स्फुरद हे पेरणीच्यावेळी द्यावे.<br>कोरडवाहू आणि बागायती क्षेत्रासाठी रब्बी ज्वारीचे शिफारस केलेले सुधारित / संकरित वाण जमिनीच्या प्रकारानुसार वापरावेत. |
| बाजरी | दाणे भरणे ते पक्वता | ➢ पावसाची उघडीप पाहून लवकर पेरणी केलेल्या व पक्व झालेल्या बाजरी पिकाची काढणी करावी व काढलेली कणसे सुरक्षित ठिकाणी ठेवावीत. |

# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| सोयाबीन | पक्वता | ➢ शेंगांचा रंग पिवळट तांबुस झाल्यानंतर, जातीच्या पक्वतेच्या कालावधीनुसार ९० ते ११० दिवसांत काढणी करावी. पीक काढणीस उशीर झाल्यास शेंग फुटण्यास सुरुवात होते. पिकाची कापणी धारदार विळयाच्या सहाय्याने जमिनीलगत करावी. |
| भुईमुग | पक्वता | ➢ भुईमुग पीक पक्व झाल्यास पाने पिवळी पडू लागतात. शेंगाचे टरफल टणक बनते व शेंगाच्या टरफलाची आतील बाजू काळी दिसू लागते. पक्व झालेल्या पिकाची वेळेत काढणी करावी. तोडणी केलेल्या शेंगा पुरेशे ऊन पडताच उन्हात वाळवाव्यात व कोरड्या आणि सुरक्षित ठिकाणी ठेवाव्यात. शेंगांची साठवण कोंदट व ओलसर जागेत करू नये. |
| हरभरा | पेरणी | ➢ जिरायती हरभरा पेरणीसाठी लागणाऱ्या बियाणे, खते यांची उपलब्धता करून घ्यावी तसेच जिरायत हरभरा पेरणी २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या दरम्यान जमिनीमध्ये वाफसा असताना करावी<br>➢ पेरणीकरता फुले विक्रम, फुले विश्वराज, विजय, इ. वाणांची निवड करावी<br>➢ बिजप्रक्रीया करणे अत्यंत महत्त्वाचे असुन खरीप हंगामातील सोयाबीन पीक निघाल्यानंतर मुळ कुज व मान कुज या रोगापासून संरक्षण होण्यासाठी ट्रायकोडर्मा हरजियानाम १.०% डब्ल्यू. पी. ६ ग्रॅम प्रति किलो बीजप्रकियेसाठी तसेच आळवणीसाठी लागवडीनंतर ५० दिवसांनी वापरावी. यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पी.एस.बी. प्रति १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणामध्ये मिसळून चोळावे. असे बियाणे तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. यामुळे पिकाचे रोप अवस्थेत बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण होते. मुळावरील नत्राच्या ग्रंथी वाढतात आणि पिकाची वाढ चांगली होते.<br>➢ हरभऱ्यावरील घाटे आळीच्या एकात्मिक नियंत्रणासाठी पेरणीच्या वेळी हेक्टरी २०० ग्रॅम ज्वारी हरभरा पेरताना मिसळून पेरावी |
| ऊस | वाढीची अवस्था | ➢ आडसाली ऊस लागवडीस १२ ते १६ आठवडे झाले असल्यास को.८६०३२(निरा) जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र:स्फुरद:पालाश प्रती हेक्टरी) खतमात्रेच्या १० टक्के नत्र म्हणजे ५० किलो नत्र प्रती हेक्टरी देण्यासाठी युरिया ११० किलो प्रती हेक्टरी वापरावा. इतर जातींसाठी ४० किलो नत्र खताचा हप्ता देण्यासाठी ८७ किलो युरिया प्रती हेक्टरी वापरावा. |
| वांगी | फुलोरा ते फळ वाढीची | ➢ दिवसाच्या तापमानामध्ये वाढ झालेली असल्याने वांगी पिकावर शेंडा व फळ पोखरणाऱ्या प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच प्रादुर्भाव ग्रस्त किडलेले शेंडे व फळे आढळल्यास ती गोळा करून नष्ट करावीत. तसेच नियंत्रणासाठी ५ टक्के निंबोळी अर्क किंवा स्पिनोसॅड ४५% एस.सी. ४ मिली प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी.<br>➢ एकरी ४० कामगंध सापळे (फनेल टाईप) वापरावेत. |
| पशुधन | वाढीची | ➢ इशारा कालावधी दरम्यान जनावरे चारावयास नेणे टाळावे<br>➢ कमाल तापमानमध्ये वाढ होण्याची शक्यता असल्याने जनावरे सावलीच्या/सुरक्षित तसेच हवेशीर ठिकाणी बांधावीत. जनावरांना पुरेशे शुद्ध, स्वच्छ आणि थंड पाणी पिण्यास द्यावे.<br>➢ जंत निर्मुलन झालेले असल्यास लाळ खुरकत या रोगाच्या प्रतिबंधासाठी तज्ञ पशु वैद्यकांच्या सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे. |

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण : कोल्हापूर
दि. : ०८.१०.२०२४

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**